ePaper
महाराष्ट्रात तिसरी आघाडी?स्वाभिमानी-रासपच्या साथीला तेलंगणाचे मुख्यमंत्री

| वर्ष - 6 | अंक - 317 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



**आतील पानांत**

- बालेवाडी स्मार्ट सिटीत वही पेन ऐवजी विद्यार्थ्यांच्या हाती झाडू!
- सदनिकाधारकांवर नोंदणी कराचा बोजा?
- "अजितदादा तुम्ही बोलता गोड, पण..."

www.mahaenews.com | शनिवार, दि. 4 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शास्तीकर माफीचा 'जीआर' अखेर आला!

## » शिंदे-फडणवीस सरकारने 'शब्द' पाळला : 1 लाख मिळकतधारकांना दिलासा

|पिंपरी|
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी-चिंचवड शहरातील मिळकतधारकांवर लादलेला शास्तीकर पूर्ण माफ करण्याची घोषणा शिंदे-फडणवीस सरकारने केली होती. त्याला पूर्णत्व मिळाले आहे. नागपूर येथे झालेल्या अधिवेशनामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली होती. मात्र, तसा 'जीआर' निघाला नव्हता. अखेर शास्तीकर पूर्वलक्षी प्रभावाने पूर्णमाफ केल्याचा 'जीआर' राज्य सरकारने काढला आहे. गेल्या १४ वर्षांपासूनचा शास्तीकराचा प्रश्न आता कायमस्वरुपी सुटला आहे.**



पिंपरी-चिंचवड शहरातील मिळकतधारकांवर लादलेला शास्तीकर पूर्ण माफ करण्याची घोषणा शिंदे-फडणवीस सरकारने केली होती. त्याला पूर्णत्व मिळाले आहे. नागपूर येथे झालेल्या अधिवेशनामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली होती. मात्र, तसा 'जीआर' निघाला नव्हता. अखेर शास्तीकर पूर्वलक्षी प्रभावाने पूर्णमाफ केल्याचा 'जीआर' राज्य सरकारने काढला आहे. गेल्या १४ वर्षांपासूनचा शास्तीकराचा प्रश्न आता कायमस्वरुपी सुटला आहे.

भारतीय जनता पार्टीचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि विद्यमान शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी शास्तीकर माफीसाठी राज्य सरकारकडे यशस्वी पाठपुरावा केला. अखेर पिंपरी-चिंचवडकरांच्या लढ्याला यश मिळाले.

नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या परवानगीने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शास्तीकर माफीची घोषणा केली होती. आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडकरांची बाजू सक्षमपणे सभागृहात मांडली होती. त्यामुळे शहरातील सुमारे १ लाख मिळकतधारकांना दिलासा मिळाला आहे.

### निवडणुकीची घोषणा खरी ठरली...

**» राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या प्रचार सभेत शास्तीकराचा 'जीआर' लवकरच काढण्यात येईल, अशी घोषणा केली होती. गुरुवारी या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. भाजपा-शिवसेना महायुतीच्या उमेदवार अश्विनी जगताप विजयी झाल्या. त्याच्या दुसऱ्याच दिवशी राज्य सरकारने 'जीआर' प्रसिद्ध केला. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकारच्या कामगिरीवर सर्वसामान्य नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.**



> **गेल्या १४ वर्षांपासून पिंपरी-चिंचवडकरांच्या मानगुटीवर शास्तीकराचा बोजा लादण्यात आला होता. त्यामुळे सुमारे १ लाख मिळकतधारकांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागला. शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात शास्तीकरण पूर्ण माफीची घोषणा झाली. त्यामुळे पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त करतो. शास्तीकर माफीच्या लढ्यामध्ये मोठे योगदान देणारे दिवंगत लोकनेते लक्ष्मण जगताप यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांनी आपआपल्या परीने पुढाकार घेतला. त्या सर्वांचे धन्यवाद देतो.**
>
> **- महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड

# आमदार अश्विनी जगताप यांच्या विजयाचे पहिले पाऊल!

## » दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांची स्वप्नपूर्ती : पिंपरी-चिंचवडकरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न

|पिंपरी|
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**चिंचवड पोटनिवडणुकीत अश्विनी जगताप विजयी होतील की नाही, याविषयी तर्क-वितर्क लढविले जात होते. राष्ट्रवादी ज्या त्वेषाने प्रचार करत होती. ते पाहून ही लढत एकांगी नाही, असे दिसत होते. मात्र, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगवीमध्ये घेतलेल्या सभेने सारे वातावरण फिरले.**



पिंपरी-चिंचवडकरांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविण्याचा 'शब्द' दिला. अन् अश्विनी जगताप यांनी विजयाचे पहिले पाऊल टाकले. मतदारांनी भाजपला कौल दिला, आणि याच अश्विनी जगताप यांच्या पावलांनी आज तो शब्द खरा ठरवला आणि पिंपरी-चिंचवड शहराचा सामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचा शास्तीकराचा प्रश्न पूर्णपणे सुटला स्व. लक्ष्मण जगताप यांच्या स्वप्नांची पूर्ती झाली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक प्रचारात आश्वासन दिल्याप्रमाणे आपला शब्द पाळला आहे. आचारसंहिता संपताच पिंपरी चिंचवड शहरातील अवैध बांधकामांचा शास्तीकर माफ करण्याचा शासकिय आदेश आज काढण्यात आला. शहरातील सुमारे एक लाख अवैध बांधकामांसाठी ही मोठी खूशखबर आहे. चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकित भाजपच्या अश्विनी जगताप यांचा दणदणीत विजय होताच राज्य सरकारने पिंपरी चिंचवड शहरातील एक लाख कुटुंबांना ही मोठी गिफ्ट दिली आहे. निकाल लागताच दुसऱ्याच दिवशी हा आदेश निघाला हे आणखी विशेष आहे.

### शिंदे-फडणवीस सरकारने करुन दाखवले...

» शहरातील अवैध बांधकामांना २००८ पासून शास्तीकर लागू केला आहे. मिळकतकराच्या दुप्पट शास्ती असल्याने महापालिकेचा सुमारे ६०० कोटी कर थकीत आहे. शास्तीकर अवास्तव असल्याने मूळ करसुद्धा कोणी भरत नाही. महापालिकेच्या मिळकतकर महसुलावरही त्याचा मोठा परिणाम झाला. निवडणुकिच्यावेळी भाजपने त्याबाबत आश्वासन दिले होते. स्वतः फडणवीस यांनी आपल्या भाषणात त्याबाबत ठोस आश्वासन दिले होते, ते खरे करुन दाखवले. महाराष्ट्र शासनाचे उपसचिव प्रियांका कुलकर्णी-छापवाले यांनी आज त्याबाबतचा आदेश काढला आहे.

# कसब्यात भाजपला अति आत्मविश्वास नडला!

## » प्रचारात जुन्या जाणत्यांना डावलल्याची भाजपला मोजावी लागली किंमत

। पुणे । महाईन्यूज ।

**मतदारांना गृहीत धरणे, अति आत्मविश्वास, लादण्यात आलेला उमेदवार, त्यातून निर्माण झालेली नाराजी, निवडणुकीत अवलंबलेली साम, दाम, दंड, रणनीती, मतदारांना दाखविण्यात आलेली प्रलोभने, वैयक्तिक जनसंपर्काचा अभाव आदी कारणांमुळे कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार हेमंत रासने यांचा पराभव झाला. प्रचारात जुन्या जाणत्यांना डावलल्याची किंमतही भाजपला मोजावी लागली.**

भाजपच्या विजयी उमेदवार अश्विनी जगताप यांचे मताधिक्य आणि बंडखोर राहुल कलाटे यांना मिळालेली एकूण मते पाहता भाजपला महाविकास आघाडीतील बंडखोरीने तारल्याचे स्पष्ट होते. २०१९ च्या निवडणुकीत उमेदवारही देऊ न शकलेल्या राष्ट्रवादीने कडवी झुंज दिली. मात्र, बंडखोरीमुळे विजयाला गवसणी घालता आली नाही. बंडखोरीमुळे भाजपने चिंचवडचा गड राखला.

### मुंबईत काँग्रेसचा जल्लोष

मुंबई : कसबा पेठ पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार रविद्र धंगेकर यांचा विजय खूप बोलका आहे. कसबा पेठेत जनशक्तीने महाशक्तीच्या धनशक्तीचा पराभव करून इतिहास घडवला आहे. इतकेच नव्हेतर, दहशत निर्माण करुन निवडणुका जिंकण्याचे भाजपचे मनसुबे कसब्यातील मतदारांनी उधळून लावले आहेत, अशी प्रतिक्रिया काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यानी व्यक्त केली. टिळक भवन येथे ढोल ताशांच्या गजरात मिठाई वाटून, फटाके फोडून विजय साजरा करण्यात आला.



### आता माझी पाळी ...

कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत विजय मिळवून भाजपाला पराभवाचा धक्का देणारे काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांनी विजयानंतर सूचक प्रतिक्रिया दिली आहे. धंगेकरांनी तब्बल ११ हजाराहून अधिक मतांनी विजय मिळवला आहे. गेल्या २८ वर्षांपासून हा मतदारसंघ भाजपाकडे होते. आता पुन्हा एकदा या मतदारसंघात काँग्रेसचा आमदार झाल्यामुळे या निकालावर मोठी चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर विजयी उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी बोलताना निवडणूक काळात गैरप्रकार करणाऱ्यांना अद्दल घडवण्याबाबत सूचक विधान केलं आहे.

### कसब्यात काय लागला निकाल?

» कसबा पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या रवींद्र धंगेकरांनी भाजपाच्या हेमंत रासनेंचा पराभव केला. मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर रिकाम्या झालेल्या जागेसाठी पोटनिवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत टिळक कुटुंबातीलच एका व्यक्तीला आमदारकीचं तिकिट दिलं जावं, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती. टिळक कुटुंबीयांकडूनही तशी इच्छा व्यक्त केली गेली. मात्र, भाजपाकडून माजी नगरसेवक हेमंत रासने यांना उमेदवारी देण्यात आल्यामुळे या मतदारसंघात भाजपाविरोधात नाराजी असल्याचं सांगितलं गेलं.

### "करोडोंचा पाऊस पडल्यानंतरही..."

» दरम्यान, मतदानाच्या आधी भाजपाकडून पैसे वाटप केल्याचा आरोप रवींद्र धंगेकरांनी केला होता. त्याचा निषेध म्हणून त्यांनी आंदोलनही केलं होतं. आता विजयी झाल्यानंतर रवींद्र धंगेकर यांनी सूचक प्रतिक्रिया देत गैरप्रकार करणाऱ्यांना अद्दल घडवण्याचे संकेत दिले आहेत. करोडोंचा पाऊस पाडल्यानंतरही जनतेनं ते पैसे स्वीकारले नाहीत. शेवटी पैसा हरला आणि कार्यकर्ता जिंकला. जनशक्ती जिंकली आणि धनशक्ती हरली.

### "गिरीश बापट यांनी कधी असं केलं नाही"

» "कुरघोडीचं राजकारण, पोलीस यंत्रणा, निवडणूक यंत्रणा, गुंडांच्या मार्फत केलेला प्रचार.. हा सगळा किळसवाणा प्रकार होता. मीही गिरीश बापटांविरोधात निवडणूक लढवली आहे. पण त्यांनी कधी असं केलं नाही. यावेळी जिवाशी खेळण्यापर्यंत ही निवडणूक गेली होती. पोलिसांकडून दमदाटी करणं, गुंडांमार्फत धमकी देणं असे प्रकार झाले", असा दावा रवींद्र धंगेकर यांनी केला आहे.

# विरोधकांच्या एकीने महापालिकेत भाजपचे गणित बिघडण्याची शक्यता

## » महापालिका निवडणुकीत आघाडी राहणार की नाही यावर महापालिकेतील सत्ताधारी ठरणार

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षाच्या महाविकास आघाडीने कसबा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणूक एकत्र निवडणूक लढवून भाजपचा बालेकिल्ल्यात पराभव करता येऊ शकतो हे दाखवून दिले. ही आघाडी आगामी पुणे महापालिका निवडणुकीत कायम राहिली तर भाजपच्या ९९ नगरसेवकांपैकी ५७ जण धोक्यात येऊ शकतात असे आकडेवारी वरून समोर आले आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीत आघाडी राहणार की नाही यावर महापालिकेतील सत्ताधारी ठरणार आहे.**

कसबा विधानसभा मतदारसंघात गेल्या २८ वर्षापासून भाजपचा सलग सहा वेळा विजय झाल्याने हा मतदारसंघ सुरक्षीत मानला जात होता. आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनामुळे पोटनिवडणूक जाहीर झाली. २०१७ च्या महापालिका निवडणुकीमध्ये सर्वच राजकीय पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवली. यामध्ये १६२ पैकी ९९ नगरसेवक भाजपचे निवडून गेले. या नगरसेवकांची मुदत मार्च २०२२ मध्ये संपली आहे. गेल्या एका वर्षापासून प्रशासकाच्या माध्यमातून काम सुरू आहे. आगामी महापालिका निवडणुका कधी होणार हे स्पष्ट झालेले नसले तरी कसब्याच्या पोटनिवडणुकीतील पराभव भाजपचे डोळे उघडणारा ठरणार आहे. आगामी महापालिका निवडणुकीत सत्ता हवी असेल तर



किमान ८७ पेक्षा जास्त नगरसेवक निवडून येणे आवश्यक आहे. त्यामुळे भाजपकडून यापूर्वी११० नगरसेवक निवडून आणण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

प्रभाग क्रमांक १ धानोरी कळस (३), प्रभाग क्रमांक ३ विमाननगर सोमनाथनगर (४), प्रभाग क्रमांक ५ वडगावशेरी कल्याणीनगर (३), प्रभाग क्रमांक पुणे विद्यापीठ वाकडेवाडी ७ (४), प्रभाग क्रमांक ८ औंध बोपोडी (४), प्रभाग क्रमांक ९ बाणेर बालेवाडी (२), प्रभाग क्रमांक १० बावधन खु. कोथरूड डेपो (२), प्रभाग क्रमांक ११ रामबाग कॉलनी शिवतीर्थ नगर ( १), प्रभाग क्रमांक १४ डेक्कन जिमखाना (४), प्रभाग क्रमांक १६ कसबा सोमवार पेठ (१), प्रभाग क्रमांक १७ रस्ता पेठ रविवार पेठ (१), प्रभाग क्रमांक १८ खडकमाळ आळी महात्मा फुले पेठ (३), प्रभाग क्रमांक १९ लोहियानगर कासेवाडी (१), प्रभाग क्रमांक २१ कोरेगाव पार्क घोरपडी (१), प्रभाग क्रमांक २३ हडपसर गावठाण सातववाडी (२), प्रभाग क्रमांक २५ वानवडी (२), प्रभाग क्रमांक २६ महंमदवाडी कौसरबाग (१), प्रभाग क्रमांक २९ नवी पेठ पर्वती (२), प्रभाग क्रमांक ३० जनता वसाहत दत्तवाडी (३), प्रभाग क्रमांक ३१ कर्वेनगर (३), प्रभाग क्रमांक ३३ वडगाव धायरी (१),प्रभाग क्रमांक ३५ सहकार नगर पद्मावती (१), प्रभाग क्रमांक ३६ मार्केटयार्ड लोअर इंदिरानगर (१), प्रभाग क्रमांक ३७ अप्पर सुपर इंदिरानगर (१), प्रभाग क्रमांक ३८ बालाजीनगर राजीव गांधी नगर (२), प्रभाग क्रमांक ३९ आंबेगाव दत्तनगर कात्रज गावठाण (१), प्रभाग क्रमांक ४१ कोंढवा बु. येवलेवाडी (३).

### असा बसू शकतो फटका

» महापालिका निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना ठाकरे गटाने आघाडी कायम ठेवली तर त्याचा थेट फटका भाजपला बसू शकतो. चारचा प्रभाग झाला तर त्यांचे ९९ पैकी ५७ नगरसेवक धोक्यात येऊ शकतात. तर ४२ नगरसेवकांना या आघाडीचा कोणताही फरक पडणार नाही., तेथे भाजपची ताकद जास्त असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. मात्र, आघाडीतील कुरबुरी, जागा वाटपातील वाद, त्यातून होणारी बंडखोरी, स्थानिक समीकरणे, नातीगोती, उमेदवाराची प्रतिमा हे मुद्देही लक्षात घेऊन काही प्रभागात भाजपला दिलासाही मिळू शकतो. पण २०१७ च्या महापालिका निवडणुकीच्या निकालातील आकडेवारीवरून कोणत्या कोणत्या प्रभागात फटका बसू शकते हे स्पष्ट होत आहे.

# सदनिकाधारकांवर नोंदणी कराचा बोजा?

## » महापालिका आयुक्तांना निवेदन : नियमावली पूर्ववत करण्याची मागणी

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडून मालमत्ता हस्तांतरण आणि नोंदणी करताना आकारण्यात येणाऱ्या नोंदणी करात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. याला सोसायटीधारकांनी विरोध केला असून, अशाप्रकारे वाढीव वसुली प्रशासनाने रद्द करावी अशी मागणी होत आहे.**



चिंखली- मोशी- पिंपरी- चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनने याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेची प्रशासकीय राजवट चालू झाल्यापासून एप्रिल 2022 मध्ये निर्णय घेण्यात आला. मिळकतधारकांना मालमत्तेची करसंकलन विभागात नोंदणी करण्यासाठी 'ट्रान्फर फी' म्हणून खरेदी किमतीच्या 0.5 % रक्कम आकारली जाते. वास्तविक, यापूर्वी असा नियम नव्हता. पूर्वी ट्रान्स्फर फी, नोंदणी फी म्हणून सामान्य कराच्या 10% एवढी रक्कम घेतली जात होती. मालमत्ता खरेदीच्या 0.5% घेण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो सर्वसामान्यांना परवडणारा नाही.

बांधकाम व्यावसायिकाकडून सोसयटीमधील सदनिकाधारक सदनिका खरेदी करतो आणि त्याची नोंदणी करसंकलन विभागात कर आकारणीसाठी करतो. त्यावेळी मालमत्तेची प्रथम नोंदणी करण्याची जबाबदारी पूर्णपणे विकासकाची असते. काही कारणास्तव विकासक ती करत नसेल व सदनिकाधारक करत असतील, तर ही मालमत्तेची प्रथम नोंदणी असल्याने त्यावर ट्रान्स्फर फी घेऊ नये. कारण ही खरेदी नंतरची पहिलीच नोंदणी असते. तरीदेखील या नवीन नियमात यांच्याकडून देखील मालमत्ता खरेदीच्या 0.5% नोंदणी फी घेतली जाते. ही बाब अतिशय चुकीची व अन्याकारक आहे.

जो नवीन नियम करून मालमत्ता खरेदीच्या 0.5% रक्कम नोंदणी फी म्हणून घेतला जातो. ते बंद करून पूर्वी प्रमाणेच मालमत्तेची करआकारणी करण्यासाठी नोंदणी करताना सामान्य कराच्या 10 % एवढी रक्कम आकारावी.

तसेच मालमत्तेची करआकारणीसाठी प्रथमच नोंदणी होणार असेल तर ती निशुल्क करावी, अशी मागणी करण्यात आलेली आहे.



> **"पिंपरी-चिंचवड मनपामध्ये प्रशासक राजवट सुरू झाली आहे. तसे प्रशासन आमच्या सोसायटीधारकांना 'सॉफ्ट टार्गेट' समजून आमच्यावर अन्याय करत आहेत. काही सदनिकाधारकांनी प्रॉपर्टी टॅक्स भरला नाही म्हणून पूर्ण सोसायटीचे पाण्याचे नळ कनेक्शन कट करणे, सोसायटीधारकांना अपुरा पाणीपूरवठा करणे, कर आकारणीसाठी अव्वाच्या सव्वा रक्कम आकारणे, बिल्डरच्या बेकायदेशीर कामाबाबत अनेक तक्रारी करून देखील बिल्डरला पाठीशी घालून त्यावर कारवाई न करणे. अशी काम चालू आहेत.**
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशन.**

---

# धुलीवंदन-होळीनिमित्त नैसर्गिक रंगांना प्राधान्य, विद्यार्थ्यांची कार्यशाळा!

## » विद्यार्थ्यांची ऑनलाईन उपस्थिती : पालिका प्रशासनाकडून जनजागृती

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत पालिकेच्या दिवंगत मधुकर पवळे सभागृह पिंपरी येथे धुलीवंदन व होळी निमित्त नैसर्गिक रंग निर्मिती ऑनलाईन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला शहरातील विविध शाळेतील सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन उपस्थिती दर्शविली. या कार्यशाळेचे उदघाटन पालिकेचे अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांनी केले.**

आधुनिकतेच्या जगामध्ये वावरत असताना अनेक पारंपरिक गोष्टींचा विसर पडत आहे. रासायनिक रंग निर्मिती हा त्यातीलच एक प्रकार. होळी व धुलीवंदन दिवशी आपण अशा अनेक रासायनिक रंगांचा वापर करतो ज्यामुळे शरीराला व निसर्गाला हानी पोहचते, तसेच हे टाळण्यासाठी नैसर्गिक व पारंपारिक रंगांचा वापर करणे गरजेचे आहे. पुढील पिढीला नैसर्गिक व पर्यावरण रंगांची ओळख करून देणे आपले कर्तव्य आहे. यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे, असे अतिरिक्त आयुक्त वाघ म्हणाले.

या वेळी उप आयुक्त रविकिरण घोडके, माध्यमिक शिक्षण विभागाचे उप आयुक्त संदिप खोत, स्वच्छ भारत समन्वयक तथा सहायक आयुक्त सोनम देशमुख, पर्यावरण संरक्षण गतिविधी पिंपरी चिंचवड जिल्हा संरक्षण ओंकार(सागर) नाझरकर, पर्यावरण संरक्षण गतिविधी चिंचवड गट संरक्षण सुधीर माऊलकर उपस्थित होते.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन सहाय्यक आयुक्त सोनम देशमुख यांनी केले. त्यावेळी त्यांनी 'अंजन कांचन करवंदीच्या काटेरी देशा, बकुलफुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा' या काव्यातून महाराष्ट्राचे केलेल्या वर्णनाचे महत्व सांगितले.

पालिकेकडून माझी वसुंधरा अंतर्गत असे अनेक उपक्रम घेण्यात येतात, या कार्यक्रमात नागरिकांनी सहभागी होवून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शहरवासियांनी सहकार्य करावे असेही देशमुख म्हणाल्या.



### निसर्ग समजून घेतला पाहिजे : प्रिया फुलंब्रीकर

**»नैसर्गिक रंग निर्मिती प्रशिक्षक प्रिया फुलंब्रीकर यांनी या कार्यशाळेत नैसर्गिक रंग निर्मिती बाबत मार्गदर्शन केले तसेच अनेक वेगवेगळ्या फुलांपासून रंग कसे बनवायचे याचे प्रात्यक्षिक दाखविले. द्राक्षांच्या सालीपासून हिरवा रंग बनतो तर कांद्याच्या पातीपासून फिकट गुलाबी रंग बनतो या रंगांचे पाणी निसर्गाला आणि मानवाला दोघांनाही औषध म्हणून वापरण्यात येते. जास्वंदीच्या फुलांचा रंग लाल असला तरी त्याचा काळा रंग तयार होतो कारण त्यामध्ये लोहचे प्रमाण अधिक असते. निसर्गाच्या या रंगांच्या गंमतीजमती मानवाने अनुभवल्या पाहिजेत, निसर्ग समजून घेतला पाहिजे अशा अनेक बाबी त्यांनी सविस्तर सांगितल्या.**

---

# विद्यार्थ्यांना "अवयव दान" विषयावर मार्गदर्शन



।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, वायसीएम रुग्णालय, स्मार्ट सिटी व अखिल भारतीय भूलतज्ञ संघटना (सोसायटी ऑफ ऍनेस्थेसियोलॉजिस्ट) पिंपरी चिंचवड शाखेच्यावतीने डॉ. डी. वाय. पाटील ए.सी.एस. कॉलेज, आकुर्डी येथे हृदयविकाराच्या झटक्यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत एखाद्या व्यक्तीचे प्राण कसे वाचवायचे आणि "अवयव दान" या विषयावर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

आरोग्य जनजागृती कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यशाळेत हृदयविकाराचा झटका, शॉक, अपघात आदी. मार्गदर्शक तत्त्वांनुसार सीपीआर / सीओएलएस कार्यक्रम घेण्यात आले. तसेच, यामध्ये, वायसीएम रुग्णालयाचे उपअधीक्षक तथा भूलतज्ज्ञ डॉ. उज्वला अंदुरकर, डॉ. निलम कदम, डॉ. मनीषा सूर्यवंशी यांनी प्रत्यक्ष प्रशिक्षण देवून विद्यार्थ्यांना "अवयव दान" या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी, डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजचे प्राचार्य डॉ. मोहन वामन, विज्ञान विद्याशाखा प्रभारी डॉ. मुकेश तिवारी, वाणिज्य विद्याशाखा प्रभारी डॉ. विजय गाडे, प्राणीशास्त्र विभागाचे प्रा. सतीश ठाकर, मनपा अधिकारी व स्मार्ट सिटीचे प्रतिनिधी बिनीश सुरेंदरन, जस्टीन मॅथ्यू, किरण लवटे यांचेसह शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सहभागी विद्यार्थ्यांना मॅनेक्विनवर प्रशिक्षण देण्यात आले. प्रत्येक नागरिकाला जीवनरक्षक हेच ध्येय समोर ठेवून ऍनेस्थेसियोलॉजिस्टद्वारे सामान्य नागरिकांसाठी जागरूकता कार्यक्रम विनामूल्य घेण्यात येतो. प्रत्येक नागरिक जीवन वाचवू शकतो. या उद्देश्याने सोसायटी ऑफ ऍनेस्थेसियोलॉजिस्ट पिंपरी चिंचवड (एसएपीसी) इंडियन सोसायटी ऑफ ऍनेस्थेसियोलॉजिस्ट (ISA) यांच्या संयुक्त विद्यमाने COLS (कंप्रेशन ओन्ली लाईफ सपोर्ट) जनजागृती करण्यात येत आहे.

## संपादकीय »

## महिलांच्या सर्वांगीण विकासाला अग्रक्रम

***स्त्री - पुरुष समानता ही भारतीय संस्कृतीत अध्याहतच आहे. आपली भूमी ही अर्धनारीश्वराची आहे, जिथे दैवी पुरुष शिव आणि दैवी स्त्री शक्ती एकमेकांत विलीन होतात, एकरुप स्वरुपात अस्तित्वात असतात.***

स्त्री-पुरुष अशी कोणतीही विषमता नाही. तथापि, दुर्दैवाने देशावरील अनेक आक्रमणांमुळे झालेल्या सामाजिक अध:पतनामुळे प्रतिगामी, प्रतिबंधात्मक प्रथा निर्माण झाल्या आणि लैंगिक विषमतेचा घाट घातला गेला. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे सरकार २०१४मध्ये सत्तेवर आल्यापासून देशाला राजकीय स्थिरतेकडे नेले. 'नारीशक्ती' त्यांच्या जाहीरनाम्यात नेहमीच अग्रभागी राहिली. पंतप्रधान मोदींच्या धोरणांनी देशातील लैंगिक न्यायाच्या संकल्पनांची नव्याने संरचना केली.

यशस्वी 'जन धन योजना'

मोदी सरकारने 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजनेद्वारे घटते बाल लिंग गुणोत्तर रोखण्याचे प्रयत्न केले. स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी आणि मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहनाचा हा प्रयत्न आहे. मुलींबाबत समाजाची मानसिकता बदलणे आणि सामाजिक स्तरावर लैंगिक असमानतेचा सामना करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. महिलांचे आर्थिक समावेशन आणि त्यांच्या उद्योजकतेचा गौरव करून पंतप्रधानांनी लैंगिक न्यायाची संकल्पना साकारली. त्यांच्याद्वारे सुरू केलेली प्रधानमंत्री जन धन योजना (पीएमजेडीवाय) ही महिलांमध्ये आर्थिक समावेशनाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरली. कारण महिलांना याआधी औपचारिक बँकिंग व्यवस्थेतून अनेकदा वगळले होते.संकेतस्थळावर फेब्रुवारी-२०२३ पर्यंत उपलब्ध आकडेवारीनुसार, २३.२४ कोटींहून अधिक महिलांनी या योजनेंतर्गत खाती उघडली. उघडलेल्या एकूण खात्यांपैकी ती ५६% आहेत. लाखो महिलांना औपचारिक बँकिंग प्रणालीमध्ये आणण्यात, आर्थिक समावेशनाला चालना देण्यात आणि महिलांच्या सक्षमीकरणात 'पीएमजेडीवाय' यशस्वी ठरली. बँक खात्यामुळे महिलांचे त्यांच्या पैशांवर अधिक नियंत्रण राहते. तसेच आर्थिक पाठबळासाठी कुटुंबातील पुरुष सदस्यांवर त्यांचे अवलंबित्व कमी होते.




# दुष्काळाची भीती कितपत खरी?



येत्या पावसाळ्यावर एल निनोचा परिणाम होणार काय, अशी शंका एका बातमीने निर्माण केली आहे. एल निनोची कोठून आली बातमी? अमेरिकी नोआ (NOAA-नॅशनल ओशनिक अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशन) या संस्थेने हा अंदाज व्यक्त केला आहे. प्रत्येक तीन ते सहा वर्षांनी डोकावणारा व भारतीय पावसाळ्याला दणका देणारा हा एल-निनो २०१८ साली भारतात हजेरी लावून गेला व त्या वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला होता. यंदा जर एल निनोचा परिणाम झाला तर भारतात पावसाळा उशिरा सुरू होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. याचाच अर्थ, २०२३ च्या जून ते सप्टेंबर ह्या पावसाळी हंगामाच्या कालावधीत १५ जुलै किंवा १ ऑगस्ट २०२३ नंतर पावसाला ओढ बसण्याची, दुष्काळाचे सावट, पाणी टंचाई, नापिकी अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. मात्र, या बातमीत कितपत तथ्य आहे, हा प्रश्न आहे. एखाद्या परदेशी संस्थेने अशा स्वरुपाच्या बातम्या देणे म्हणजे भारतीय समाजाला भ्रमित करण्याचा प्रयत्न आहे का, हेही तपासून पाहण्याची गरज आहे. आज एल निनोची शक्यता केवळ ५० टक्केच आहे. तेवढ्यावरून मोसमी पावसाला विलंब होईल किंवा यंदा पाऊसच होणार नाही किंवा दुष्काळ पडू शकतो, अशा स्वरुपाचे अंदाज बांधणे चूक आहे. याचे आणखी एक कारण म्हणजे हा परदेशी संस्थेचा अहवाल आला असला तरी भारतीय हवामान खात्याने अद्याप कोणताही अंदाज व्यक्त केलेला नाही. गेले काही वर्षे भारतीय हवामान खाते अचूक अंदाज व्यक्त करीत आहे. तेव्हा यंदाच्या या अंदाजाची वाट पाहणे आवश्यक आहे. विज्ञान व संशोधनाच्या आधारे पुढील २०२३ च्या जून नंतरच्या नियोजनसासाठी वैज्ञानिक संस्थानकडून अचूक आगाऊ बातमी मिळणे हे जरी वैज्ञानिक संशोधनाला आव्हान असले तरी हीच विज्ञानाची व संशोधनाची खरी कसोटी होय.

पावसाळी हंगामाचा अंदाज किंवा वर्षभरातील पावसाचा अंदाज अनेक घटकांवर अवलंबून असतो. तो करताना देशभरातील विविध संस्थांच्या अभ्यासाचाही आधार घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे, विविध प्रकारच्या हवामान घटकांचा विचार करावा लागतो. केवळ एकाच घटकाच्या आधारावर असा अंदाज व्यक्त करणे चूक ठरू शकते. यामुळेच, भारतीय हवामान विभाग ऑक्टोबर ते पुढील वर्षाचा एप्रिल असा प्रदीर्घ काळ अभ्यास करीत असतो. अनेक घटकांचा परामर्श घेत असतो. त्यातून आपला अंतिम अंदाज हवामान विभाग तयार करीत असतो. तो अंदाज इतक्या लवकर व्यक्त करणे शक्य नसते आणि तो अचूक असण्याची शक्यताही कमी असते. या प्रक्रियेनुसारच दरवर्षी पावसाळ्याचा किंवा मान्सूनचा पहिला ठोस अंदाज एप्रिलच्या मध्यावर व्यक्त केला जातो. त्यानंतर, मान्सूनची गती आणि प्रगती पाहून दुसरा अंदाज साधारण ४५ दिवसांनी म्हणजे मे महिन्याच्या अखेर दिला जातो. हा दुसरा अंदाज शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असतो. देशातील सारी राज्य सरकारेही या अंदाजाची योग्य ती दखल घेऊन तयारीला लागतात. संभाव्य संकटासाठीही पूर्वतयारी करतात. त्यानंतर, ६० दिवसांनी म्हणजे जुलै महिन्याच्या अखेर तिसरा अंदाज दिला जातो. हा शेवटचा व सुधारित अंदाज असतो. यातून एकूण मान्सूनचा प्रवास सुस्पष्ट होतो. एवढे करूनही हवामान विभागाचे काम संपत नाही. पावसाळा अधिकृतपणे संपल्यानंतर एक ऑक्टोबर रोजी मान्सूनच्या अंदाजाचे अवलोकन आणि अभ्यास केला जातो. ही सगळी प्रक्रिया वर्षानुवर्षे होत आली आहे आणि ती शास्त्रशुद्ध आहे. त्या आधारे त्यावर्षी येणाऱ्या प्रत्येक पावसाळ्याचा पहिला अंदाज एप्रिलच्या मध्यावर तर दुसरा ४५ दिवसानंतर म्हणजे मे अखेर तर तिसरा अंदाज ६० दिवसानंतर म्हणजे जुलैअखेर प्रत्येक अंदाज सुधारितपणे वर्तवत असतो. व शेवटी १ ऑक्टोबरला अंदाजाचे पूर्वालोकन केले जाते. कोणताही अंदाज देण्यापूर्वी हवामान विभाग जागतिक हवामान स्थितीचा अभ्यास करीत असतो. यातल्या काही घटकांचा आपण विचार करूया.

**दरवर्षी १० वी १२ वीच्या परीक्षा जवळ आल्या की सरकारमार्फत कॉपीमुक्त परीक्षेची टिमकी वाजविण्यात येते. कोविडमुळे गेल्या दोन वर्षांत शिक्षणव्यवस्थेत प्रचंड गोंधळ उडाला. या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या १० वी- १२ वीच्या परीक्षा आता सुरू होत आहेत.**

# कॉपीमुक्त परीक्षा खरंच शक्य आहेत का?



परीक्षाकाळात राज्यात १० वी व १२ वीच्या परीक्षा केंद्रांवर होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी 'कॉपीमुक्ती अभियान' राबविण्यात येणार आहे, असे राज्य सरकारने जाहीर केले आहे. हे अभियान चार नियमांच्या जोरावर राबविले जाणार आहे. यात पोलीस बंदोबस्तावर भर देण्यात येणार आहे. परीक्षा केंद्राच्या ५० मीटरच्या परिघात परीक्षाप्रक्रियेशी संबंध नसणाऱ्या व्यक्तींना प्रवेश दिला जाणार नाही. अतिसंवेदनशील, संवेदनशील, सर्वसाधारण असे परीक्षा केंद्रांचे वर्गीकरण करण्यात येणार आहे. कलम १४४ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश देण्यात येणार आहेत. ५० मीटरच्या आतील सर्व झेरॉक्स दुकाने बंद ठेवली जातील, असे अनेक निर्बंध घातले जाणार आहेत. खरा प्रश्न आहे तो अंमलबजावणीचा! नियमावलीचे काटेकोर पालन होणार का आणि परीक्षा खरोखरच कॉपीमुक्त होणार का? अलीकडच्या काळात दहावी-बारावीच्या परीक्षांना पूर्वीसारखे महत्त्व राहिलेले नाही या परीक्षांचा उपयोग केवळ पुढच्या वर्गात प्रवेश मिळवण्याइतपतच राहिला आहे. कारण अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे प्रवेश हे नीट, जेईई यांसारख्या प्रवेश परीक्षांवर आधारित असतात. यात बारावीच्या गुणांना काही किंमत राहत नाही. नवीन शैक्षणिक धोरणानुसार तर मूल्यमापन प्रणालीद्वारे परीक्षा होणार आहेत. अर्थात याची सुरुवात पुढील वर्षापासून होणार असली तरी अद्याप याबद्दल पुरेशी स्पष्टता नाही. त्याचा निश्चित आराखडा एनईपी-२०२० म्हणजेच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अजून तरी नमूद केला गेलेला नाही.

कॉपीमुक्त परीक्षेचा इतिहास पाहिल्यास लक्षात येईल की बोर्डाचे कॉपीमुक्त परीक्षा किंवा 'गैरमार्गाविरुद्ध लढा' हे अभियान म्हणजे निव्वळ धूळफेक आहे. केवळ बोभाटा. प्रत्यक्ष कारवाई शून्य. सरकारी धाटणीची केवळ कृतिशून्य घोषणा असेच म्हणता येईल. याचे उदाहरण द्यायचे झाले तर गल्लीपासून दिल्लीपर्यंत सर्वपक्षीय राज्यकर्ते, प्रशासन, नागरिक- सामाजिक संस्था भ्रष्टाचारमुक्तीचा डंका पिटत असतात, मात्र आजही भ्रष्टाचार भारतीय व्यवस्थेचा अंगभूत घटक आहे, कारण भ्रष्टाचारमुक्ती ही केवळ उक्ती आहे, कृती नाही. अगदी तसेच कॉपीमुक्त परीक्षांबाबत म्हणता येऊ शकेल. खऱ्या अर्थाने कॉपीमुक्त परीक्षा घेतल्या तर शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेचे पितळ उघडे पडेल ही भीती शिक्षणाशी निगडित सर्वच घटकांना असल्यामुळे ना शिक्षण खाते, ना बोर्ड, ना शिक्षक/पर्यवेक्षक कॉपीमुक्त परीक्षांना साथ देत. यामागे बरीच करणे आहेत.

सर्वांत पहिले कारण म्हणजे, आज गल्लोगल्ली अभियांत्रिकी तसेच इतर व्यावसायिक खासगी महाविद्यालये तसेच सीबीएसईच्या शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालये उघडली गेली आहेत. या सर्व शिक्षणसंस्था राजकारणी आणि व्यावसायिकांच्या आहेत. त्यामुळे त्यांनी या महाविद्यालयांना तद्दन व्यावसायिक स्वरूप दिले आहे. विद्यार्थी व पालक हा त्यांच्यासाठी ग्राहक आहे. साहजिकच शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राचे बाजारीकरण झाले आहे. यात निकालाची टक्केवारी अधिक

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# “अजितदादा तुम्ही बोलता गोड!”

## » शिंदेंची विधानसभेत जोरदार फटकेबाजी

। मुंबई । महाईन्यूज ।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी आज ( ३ मार्च ) विधानसभेत बोलताना जोरदार फटकेबाजी करत विरोधी पक्षनेते अजित पवार यांना लक्ष्य केलं. अजितदादा तुम्ही बोलता गोड, पण तुमचा कार्यक्रम सुरु असतो. त्यामुळे यापुढे असं पोटदुखीचे प्रसंग वारंवार येतील. त्यासाठी जालीम औषध म्हणून बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरु केला आहे, असा टोला एकनाथ शिंदेंनी अजित पवारांना लगावला आहे.**



“सत्तांतर झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले नसल्याने दादांना धक्का बसल्याचं त्यांनी सांगितलं. भगतसिंह कोश्यारी सुद्धा आश्चर्यचकीत झाल्याचं दादांनी म्हटलं. पण, आपण देखील उपमुख्यमंत्रीपदाची साखर झोपेत असताना शपथ घेतली. मला फोन आला, टीव्ही बघतोय तर दादा शपथ घेताना दिसत आहेत. मी त्यांना बोललो हे माघचं आहे. ते म्हणाले माघचं नाही, आताचं आहे. जयंत पाटलांना फोन केला तर त्यांनीही नाही उचलला. तो मोठा धक्का होता,” असं एकनाथ शिंदे म्हणाले. “तेव्हाच्या शपथविधीबाबत काही कथा बाहेर येत आहे. देवेंद्र फडणवीसांनी मला दोन-चार कथा सांगितल्या आहेत. त्या बोलल्या तर अनेक लोकांचं अवघड होईल. देवेंद्र फडणवीस बोलतील, तेव्हा सर्वांना धक्का बसेल, एवढी खात्री बाळगा,” असं एकनाथ शिंदेंनी म्हटलं.

“निवडणुका आल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्घाटनला आले, असं तुम्ही म्हणता. बजेट केलं, तर निवडणुका आल्याने केलं म्हणता. आम्ही निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन काम करत नाही. निवडणुका असल्या नसल्या आमचं काम सुरु राहणार आहे. निवडणुकांची आम्हाला पर्वा नाही,” असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

# अंगणवाडी सेविकांच्या मानधनात २० टक्क्यांनी वाढ



। मुंबई । महाईन्यूज ।

अंगणवाडी सेविकांसाठी मोठी बातमी समोर आली आहे. अंगणवाडी सेविकांच्या मानधनात २० टक्क्यांनी वाढ करण्यात येणार आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज पाचवा दिवस आहे. आज प्रश्नोतरच्या तासात अंगणवाडी सेविकांचा विषय होता. जवळपास 100 सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केला. 100 सदस्य प्रश्न उपस्थित करून देखील मंत्री बघू बघू म्हणत असतील हे योग्य नाही. ज्या घोषणा तोंडी केल्या जातायत त्याची सरकार अंमलबजावणी करत नाहीत. असा आरोप करत विरोधकांनी आक्रमक भूमिका मांडली.

### विरोधकांनी आक्रमक भूमिका मांडली

**» अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज पाचवा दिवस आहे. आज प्रश्नोतरच्या तासात अंगणवाडी सेविकांचा विषय होता. जवळपास 100 सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केला. 100 सदस्य प्रश्न उपस्थित करून देखील मंत्री बघू बघू म्हणत असतील हे योग्य नाही. ज्या घोषणा तोंडी केल्या जातायत त्याची सरकार अंमलबजावणी करत नाहीत. असा आरोप करत विरोधकांनी आक्रमक भूमिका मांडली.**

दरम्यान, महिला बालकल्याण विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मोठी घोषणा केली आहे. मे महिन्यापर्यंत 20 हजार अंगणवाडी सेविकांची मेगा भरती होणार आहे.

अंगणवाडी सेविकांचा २० टक्के पगार वाढ केली जाणार आहे. अंगणवाडी सेविकांना नवीन मोबाईल खरेदी करण्यासाठी १५० कोटी खर्च केले जाणार आहेत. मनपा क्षेत्रात २०० कंटेनर अंगणवाड्या सुरू करणार.

अंगणवाडी भाड्डेदर वाढवला जाणार आहे. अशी माहितीही लोढा यांनी दिली आहे.

# शिवसेना तुमच्या बापाची आहे का?

## » अर्वाच्य शब्दांत राऊतांची निवडणूक आयोगावर टीका

। सांगली । महाईन्यूज ।

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांच्यावर हक्कभंगाची कारवाई करण्याची मागणी भाजप-शिवसेनेनं केली होती. यासाठी समितीही गठीत करण्यात आली, त्यामुळं राजकारण चांगलंच तापलंय.**




त्यात आता संजय राऊतांनी 'चोरमंडळ' विधानावर स्पष्टीकरण दिलं. 'चोरमंडळ' विधानावरून राजकारण तापलं असताना संजय राऊत म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी (EKNATH SHINDE) सुद्धा विरोधी पक्षांना देशद्रोही म्हटलं ना, त्यानंतर त्यांनी सारवासारव केली. मीही तेच म्हणालो, विधीमंडळाचा अपमान होईल, आमदारांचा अपमान होईल, असं काही विधान मी केलं नाही, असं स्पष्टीकरण राऊतांनी सकाळी कोल्हापुरात दिलं.

मात्र, आज दुपारी सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यात संजय राऊतांची जीभ पुन्हा घसरलीये. राऊतांनी थेट केंद्रीय निवडणूक आयोगावर (ELECTION COMMISSION) खालच्या शब्दांत टीका केलीये. 'संघर्ष करणं हा शिवसैनिक आहे. उपाशी राहून घरची चटणी-भाकर खाऊन तुम्हाला आमदार-खासदार, मंत्री केलं. शिवसैनिक इथंच आहेत आणि तुम्ही ज्यांना निवडून दिलं, ते 50 खोके देवून पळून गेलेत.'

राऊत पुढं म्हणाले, निवडणूक आयोग सांगतोय शिवसेना त्यांची (एकनाथ शिंदे गट) आहे, तुमच्या बापाची आहे का? ही शिवसेना निवडणूक आयोगानं निर्माण केली का?, असा संतप्त सवाल राऊतांनी सांगलीतील कार्यक्रमात उपस्थित केलाय. यावेळी त्यांनी एकनाथ शिंदेंवरही जोरदार टीका केली.

### भाजपनं पाठीत खंजीर खूपसलं

**» वसंतदादा पाटील, नाना पाटील यांनी बाळासाहेब ठाकरेंना जेव्हा-जेव्हा मुंबईवर दिल्लीचं आक्रमण झालं, त्यावेळी ते शिवसेनेच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. काँग्रेसचे मोठे नेते शिवसेनेच्या पाठिशी होते. भाजपनं पाठीत खंजीर खूपसले. हे भांडण आता 40 चोरांशी नाही, तर भाजपशीही आहे, असा इशाराही राऊतांनी दिला.**

### हक्कभंगाच्या नोटिसीवर काय म्हणाले?

**» नोटीस आली असेल, पण मी अजून पाहिली नाही. माझ्या हातात नोटीस पडली नाही. नोटीस जेव्हा मी घरी, कार्यालयात जाईन तेव्हा पाहीन. तसंच माझ्या हातात जर नोटीस आली असती तर ती मी उत्तर देऊ शकलो असतो. इतक्या घाईघाईनं कायदेशीर बाबींना उत्तर देता येत नाही. तसंच मी माझी बाजू समर्थपणे मांडेन, असं देखील राऊतांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर दिलं.**

# माझी हेरगिरी होतेय!

## केंब्रिज विद्यापीठात राहुल गांधींचा मोदी सरकारवर निशाणा

।नवी दिल्ली ।महाईन्यूज।

**काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी काल, गुरुवारी परदेशात पुन्हा एकदा वादग्रस्त विधान केले आहे. लंडनच्या कैंब्रिज विद्यापीठात एमबीएच्या विद्यार्थ्यांना व्याख्यान देताना राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. भारतात लोकशाही धोक्यात असल्याचे मतही राहुल गांधी यांनी यावेळी व्यक्त केले.**

राहुल गांधी यांनी आपली हेरगिरी करण्यात आल्याचा आरोप मोदी सरकारवर करत गुप्तचर



अधिकाऱ्यांनी त्यांना फोनवर सावधगिरी बाळगत बोलण्याचा सल्ला दिल्याचे सांगितले. तसेच भारतातील सर्व संस्थांवर सरकारचा कब्जा असल्याचेही त्यांनी सांगितले. माध्यमे आणि न्यायालयांवरही सरकारचे नियंत्रण असून लोकशाहीचा मोदी सरकारने खेळ चालवला जात असल्याचा आरोपही राहुल गांधी यांनी यावेळी केला.

राहुल यांनी याआधीही लंडन, जर्मनी, अमेरिकेसह अनेक देशांत भाजपा सरकारच्या विरोधात वक्तव्ये केली आहेत. २०२२ मध्येही केंब्रिज विद्यापीठात व्याख्यान देताना राहुल गांधी यांनी भारताची तुलना पाकिस्तानसोबत केली होती. यामुळे नंतर बराच वाद झाला होता.

केंब्रिज विद्यापीठात बिझनेस स्कूलच्या विद्यार्थ्यांना काल, गुरुवारी संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले की, भारतात माध्यमे आणि न्यायव्यवस्था सरकारच्या नियंत्रणात आहे. माझ्या फोनवर पेगासस सॉफ्टवेअर होते, ज्याद्वारे माझी हेरगिरी करण्यात आली. तुमचा फोन रेकॉर्ड होत असल्याचे गुप्तचर अधिकाऱ्यांनी मला सांगितले. तसेच विरोधी पक्षातील अनेक नेत्यांवर गुन्हे आहेत, माझ्यावरही गुन्हे दाखल आहेत. अशा प्रकरणात गुन्हे दाखल आहेत, जे आम्ही कधी केलेच नाहीत. त्यामुळे आम्ही स्वत:चा बचाव करण्याचा प्रयत्न करत आहोत, असे ते म्हणाले.

'लर्निंग टू लिसेन इन इन 21 सेंचुरी' या विषयावर व्याख्यान देताना राहुल गांधी म्हणाले की, लोकशाही मूल्यांशी जे जोडले गेले नाही, असे जग निर्माण होत असल्याचे आपण पाहू शकत नाही. जगात लोकशाही मूल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नव्या विचारांची गरज आहे, त्यामुळे ते तुम्ही कोणावरही लादू शकत नाही, असे त्यांनी सांगितले. भारत आणि अमेरिकेसारख्या लोकशाही देशातील उत्पादन क्षेत्रांतील घसरणीचा उल्लेख करताना राहुल गांधी म्हणाले की, या बदलामुळे मोठ्या प्रमाणात असमानता आणि नाराजी समोर आली आहे, ज्यावर त्वरित लक्ष देण्याची आणि संवादाची गरज आहे.

### भारत जोडो यात्रेचाही उल्लेख

**केंब्रिज विद्यापीठातील व्याख्यानात राहुल गांधींनी भारत जोडो यात्रेसंबंधी अनेक गोष्टी सांगितल्या. काश्मीरबद्दल बोलताना राहुल गांधी म्हणाले की, काश्मीर गेल्या अनेक वर्षांपासून हिंसाचाराने ग्रासले आहे. सुरक्षा अधिकाऱ्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने मला तिथे न जाण्याचा इशारा दिला होता, पण भारत जोडो यात्रा काश्मीरमध्ये पोहोचल्यावर हजारो लोक तिरंगा घेऊन पुढे आले. एक व्यक्ती माझ्याजवळ आली, तिने काही मुलांकडे हात दाखवून सांगितले की, ते अतिरेकी आहेत. ती मुले माझ्याकडे एकटक पाहत होती, पण ती काहीच करू शकली नाहीत. लोकांचे ऐकण्याची आणि अहिंसेची ही ताकद असल्याचेही राहुल गांधी म्हणाले.**

---

# हिमाचलमध्ये काँग्रेस सरकारचा मोठा निर्णय

## जुनी पेन्शन योजना लागू करण्यास मंजुरी



।शिमला । महाईन्यूज । प्रतिनिधी।

हिमाचल प्रदेश सरकारने राज्यात १ एप्रिलपासून जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. हिमाचलप्रदेश सरकारकडून याबाबत अधिकृत माहिती देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुक्खू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जुनी पेन्शन योजना लागू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

यामुळे राज्य सरकारवर एक हजार कोटी रुपयांचा आर्थिक बोजा पडणार आहे. मंत्रिमंडळाने हिमाचल प्रदेश लोकशाही सेंटिनल ऑनर कायदा, 2021 आणि हिमाचल प्रदेश लोकशाही प्रहरी सन्मान नियम, 2022 रद्द करण्यास मान्यता दिली. याअंतर्गत आणीबाणीच्या काळात तुरुंगात गेलेल्यांना दरमहा ११ हजार रुपये पेन्शन देण्यात येत होते.

कर्मचाऱ्यांना जनरल प्रॉव्हिडंट फंडाच्या (जीपीएफ) कक्षेत आणण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. १५ मे २००३ नंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनाही जुन्या पेन्शन योजनेंतर्गत लवकरात लवकर पेन्शन देण्यात येणार आहे. मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे 2023-24 या आर्थिक वर्षात सरकारवर १ हजार कोटी रुपयांचा आर्थिक बोजा वाढणार आहे.

# सत्तासंघर्षाची सुनावणी रेंगाळली, घटनापीठासमोर १४ मार्च रोजी युक्तिवाद

## निकालही लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील सत्तासंघर्षावर शिंदे गटाचा युक्तिवाद गुरुवारी नियोजित वेळेत पूर्ण न झाल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठासमोरील सुनावणी आता होळीच्या सुट्टीनंतर, १४ मार्च रोजी होणार आहे. सुनावणी रेंगाळल्यामुळे निकालही लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.**

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी शिंदे गटाला गुरुवारी पहिल्या सत्रात युक्तिवाद पूर्ण करण्यास सांगितले होते. दुपारच्या सत्रामध्ये ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिबल प्रतिवाद करणार होते. सरन्यायाधीशांनी ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे शिंदे गटाचे वकील नीरज कौल यांनी युक्तिवाद आवरता घेतला. नंतर विधिज्ञ हरीश साळवे यांनी



### दोन आठवड्यांनी युक्तिवाद

**वेळापत्रकाप्रमाणे शिंदे व ठाकरे गटाच्या वकिलांचे युक्तिवाद संपण्याची शक्यता दुरावली. त्यामुळे सरन्यायाधीशांनी दुपारच्या सत्रातील घटनापीठाचे कामकाज रद्द केले.आता होळीच्या सुट्टीनंतर दोन आठवड्यांनी मंगळवारी घटनापीठासमोर साळवे आपला युक्तिवाद पुढे नेतील. शिंदे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील महेश जेठमलानी, मिनदर सिंग हेही बाजू मांडणार आहेत.**

आक्रमक युक्तिवाद केला. पण, भोजनाच्या मध्यंतरापर्यंत साळवे यांचा युक्तिवाद पूर्ण होऊ शकला नाही. वेळापत्रकाप्रमाणे शिंदे व ठाकरे गटाच्या वकिलांचे युक्तिवाद संपण्याची शक्यता दुरावली. त्यामुळे सरन्यायाधीशांनी दुपारच्या सत्रातील घटनापीठाचे कामकाज रद्द केले.आता होळीच्या सुट्टीनंतर दोन आठवड्यांनी मंगळवारी घटनापीठासमोर साळवे आपला युक्तिवाद पुढे नेतील.

# विजय मल्ल्याला सुप्रीम कोर्टाचा झटका

**नवी दिल्ली :** भारतीय स्टेट बँकेला ९,००० कोटींचा चुना लावून परदेशात पळून गेलेल्या विजय मल्ल्याला सुप्रीम कोर्टानं झटका दिला आहे. गुन्हेगार घोषीत करण्यापासून तसेच संपत्ती जप्त करण्याची कारवाई रोखावी, अशी विनंती याचिका त्यानं दाखल केली होती, ही याचिका सुप्रीम कोर्टानं फेटाळली आहे. विजय मल्ल्याला आर्थिक गुन्हेगार घोषीत करणे आणि त्याची संपत्ती जप्त करण्यासाठी मुंबईच्या स्थानिक कोर्टानं कारवाही सुरु केली आहे. ही कारवाई थांबवण्यात यावी, यासाठी मल्ल्याच्या वकिलानं सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. पण या याचिकेची दखल घेता येणार नाही, असं सांगत ही याचिका फेटाळून लावली.सुप्रीम कोर्टानं मल्ल्याच्या याचिकेवरुन ७ सप्टेंबर २०१८ रोजी ईडीला नोटीस पाठवली होती. तसेच मुंबईत पीएमएलएच्या विशेष कोर्टासमोर तपास यंत्रणांच्या याचिकेवर कारवाईवर करण्यास नकार दिला. दरम्यान, या विशेष कोर्टानं पीएमएलए कायद्यानुसार ५ जानेवारी २०१९ रोजी विजय मल्ल्याला फरार घोषित केलं.

# छोटीशी चंद्रकोर लावली माथी.. लग्न होताच अरुंधतीचा आशुतोष साठी खास उखाणा!

गेली काही दिवस स्टार प्रवाह वरील 'आई कुठे काय करते' मालिका तूफान चर्चेत आहे. अरुंधती आणि आशुतोष यांचं लग्न होणार की नाही, कधी होणार असे अनेक प्रश्न प्रेक्षकांना पडले होते. अखेर आशुतोष आणि अरुंधतीचा लग्नसोहळा पार पडला आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून या लग्नावरनं देशमुखांच्या घरात रोज नवीन राडे पाहायला मिळाले. अप्पा आणि संजना वगळता या लग्नाला सगळ्यांनी कसून विरोध केला. अनिरुद्ध ने तर कट कारस्थानांची मर्यादाच ओलांडली. अगदी त्याने अरुंधतीचे मंगळसूत्र तोंडण्या पर्यंत मजल काढली. पण अखेर अरुंधतीने हा सगळा विरोध डावलून, सगळ्या कट कारस्थानांना तोंड देऊन नव्या आयुष्याची सुरुवात करायची ठरवले आणि आशुतोष सोबत लग्नगाठ बांधली. मालिकेच्या सेटवर आज या विशेष भागाचे चित्रीकरण करण्यात आले.अरुंधती आणि आशुतोषचं हे लग्न धुमधडाक्यात पार पडलं. विशेष म्हणजे अप्पांनी दिलेल्या शब्दा प्रमाणे हे लग्नं देशमुखांच्या घरात म्हणजे अरुंधतीच्या पहिल्या सासरी अगदी थाटात पार पडलं. यावेळी अरुंधती एखाद्या नववधू सारखी दिसत होती. सध्या सोशल मीडियावर या लग्नाची बरीच चर्चा आहे. अरुंधती-आशुतोषच्या लग्नाच्या व्हिडीओंचा नुसता सुळसुळाट सुरू आहे.

अशातच एक व्हिडिओ समोर आलाय ज्यामध्ये अरुंधतीने आशुतोष साठी एक खास उखाणा घेतला आहे. अशाच एका डिजिटल वाहिनीनं लग्नानिमित्तानं केलेल्या मुलाखतीत अरुंधतीनं हा उखाणा घेतला आहे. यावेळी अरुंधती म्हणते, "छोटीशी चंद्रकोर लावली माथी... हात देते आशुतोषच्या हाती.." अरुंधतीचं हा उखाणा सध्या चांगलाच गाजत आहे.



# अभिनेत्री वाणी कपूरचा अनुभव

डोक्यात प्रेमाचं भूत घेऊन मुलींना उगाचच छळणाऱ्या सडकछाप गुंडांची काही कमी नाही. हे असे लोक कोणतीही हद्द पार करू शकतात ज्यानं जीवावर देखील बेतू शकतं. अशाच एका सडकछाप गुंडाचा अनुभव अभिनेत्री वाणी कपूरला आला आहे. रस्त्यावर अशीच टवाळखोरगिरी करणाऱ्या गुंडानं अभिनेत्री वाणी कपूरचा पाठलाग केला होता. तो माणूस खूपच जिद्दी होता आणि त्यानं १० किलोमीटरपर्यंत वाणी कपूरचा पाठलाग केला. प्रकरण मुंबईतलं होतं. वाणी कपूरच्या गाडीच्या ड्रायव्हरला त्या सडकछाप गुंडापासून वाणीची सुटका करण्यासाठी गाडीला खूप पळवावं लागलं. वाणी कपूर देखील या गोष्टीनं खूप घाबरली होती. पुढे जाऊन कळालं तो वाणीचा म्हणे फॅन होता.

अनेकदा सेलिब्रिटींना अशा विचित्र चाहत्यांमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. शाहरुख खानसोबतही काही दिवसांपूर्वी असेच झाले. चला,वाणी कपूर सोबत नेमकं या सडकछाप गुंड प्रवृत्तीच्या चाहत्यामुळे काय घडलं होतं ते जाणून घेऊया.वाणी कपूर आपल्या कारमधून मुंबईतील वर्सोवा येथून बान्द्र्याला चालली होती. अभिनेत्रीची गाडी तिचा ड्रायव्हर चालवत होता. काही वेळानंतर नोटीस केलं गेलं की एक माणूस बाईकवरनं वाणीच्या गाडीचा पाठलाग करत आहे. त्या माणसाचं नाव होतं समीर खान. तो माणूस गाडीचा पाठलाग करत आहे हे लक्षात येताच वाणी कपूरच्या ड्रायव्हरने गाडी खूप वेगात पळवायला सुरुवात केली. पण याचा काही फायदा झाला नाही. तो बाईक रायडरही वाणीच्या गाडीचा

ति त क्या च खे ळ मा गे प ण

वेगानं पाठलाग करत होता. पण काही किलोमीटर हा गाडी पळवण्याचा चालल्यानंतर वाणीची गाडी पुढे निघून गेली. आणि तो माणूस खूप राहिला.कसंबसं वाणीनं त्याच्यापासून आपला पिछा सोडवला तिच्या मनात त्या माणसाविषयीची भीती कायम राहिली. वाणीनं याबाबतीत पोलिसांची मदत घेण्याचं ठरवलं. तिनं नंतर वर्सोवा पोलिस स्टेशनमध्ये जाऊन या प्रकरणाची तक्रार दाखल केली आणि तेव्हा कुठे ती थोडी निवांत झाली. वाणीच्या वर्कफ्रंट विषयी बोलायचं झालं तर वाणी कपूरनं २०१३ मध्ये सुशांत सिंग राजपूतसोबत 'शुद्ध देसी रोमान्स' सिनेमातून आपल्या करिअरची सुरुवात केली होती.





# जेव्हा करीनाला दिली गेली होती SEX GODDESS ची उपमा...

अभिनेत्रीनं भर मुलाखतीत तडक म्हटलं होतं... बॉलीवूड अभिनेत्री करीना कपूर खाननं २००० साली 'रेफ्यूजी' सिनेमातून आपल्या करिअरला सुरुवात केली. करिनानं आपल्या करिअरमध्ये भले काही फ्लॉप सिनेमे दिले असले तरी काही हिट सिनेमांचा देखील ती भाग राहिली आहे. करिनाच्या स्टायलिश अदांचे अनेकजण दिवाने आहेत. करीनाला एकदा एका मॅगझीननं 'सेक्स गॉडेस' म्हटलं होतं..ज्यावर करीना कपूरनं तडक रीॲक्शन दिली होती. २००२ साली करीना कपूर खाननं फिल्मफेअर सोबतच्या मुलाखती दरम्यान म्हटलं होतं की,"मला आता वाटतंय की मी इथे कायम टॉपला राहण्यासाठी आली आहे आणि कायम तिथे राहण्यासाठी सेक्सी,ग्लॅमरस आणि आकर्षक दिसावंच लागतं".

" ज्या अभिनेत्री टॉपवर राहिल्या आहेत....



# दीपिका पादुकोणची 95व्या ऑस्करमध्ये होणार एन्ट्री

बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पादुकोण सध्या तिच्या 'पठाण' चित्रपट आणि त्यातील गाण्यांमुळे चर्चेत आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसकर करोडोंची कमाई करत अनेक रेकॉर्ड्स ब्रेक केले. जगभरातील प्रेक्षकांना या चित्रपटाची भुरळ पडली आहे. दरम्यान, अशातच दीपिकाने तिच्या सोशल मीडियावरुन 95 व्या अकॅडमी अवॉर्ड्समध्ये ती प्रस्तुतकर्ता म्हणून दिसणार असल्याची माहिती दिली आहे.

ही बातमी कळल्यापासून दीपिकाचे चाहते खूप खूश होऊन तिला अनेक शुभेच्छा देत आहेत.

याआधी यंदाच्या ऑ स्क र म ध्ये R R R चित्रपटातील गाणं गेल्याने भारतीय आनंदी होते. अशातच आता दीपिका देखील ऑस्करमध्ये दिसणार असल्याचं कळताच चाहेत खूप खूश झाले आहेत. दीपिका पादुकोणच्या नावाची चर्चा आता फक्त भारतापुरतीच मर्यादीत नसून ती जगभरात आहे. अनेक मोठ्या इंटरनॅशनल ब्रँड्सची ॲम्बेसेडर असण्यासोबतच दीपिकाने अनेक मोठमोठ्या कार्यक्रमांमध्ये प्रमुख उपस्थिती दर्शवली आहे. अशातच आता ऑस्करसारख्या आणखी एका मोठ्या कार्यक्रमाची भर त्यात पडली आहे. आता दीपिका ऑस्कर 2023 मध्ये प्रस्तुतकर्ता म्हणून दिसणार आहे. याबाबत तिने स्वतः सोशल मीडियावर माहिती दिली आहे. या यादीत दीपिकासोबत जगभरातील अनेक दिग्गज कलाकारांच्या नावाचा समावेश आहे.

# स्टीव्ह स्मिथने रचला इतिहास!

## 2010 नंतर कारनामा करणारा ठरला दुसरा कर्णधार

।इंदूर ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात चार सामन्यांची बॉर्डर गावसकर ट्रॉफी स्पर्धा खेळली जात आहे. या मालिकेतील आतापर्यंत तीन सामने पार पडले आहे. मालिकेतील पहिले दोन सामने भारताने जिंकले. त्याचबरोबर मालिकेतील तिसरा सामना स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वाखालील ऑस्ट्रेलिया संघाने जिंकला. स्टीव्ह स्मिथने ऑस्ट्रेलियाला तिसरा सामना जिंकून एक मोठा विक्रम नावावर केला आहे.**



पहिल्या दोन कसोटीत पॅट कमिन्सला जे जमले नाही ते स्टीव्ह स्मिथने तिसऱ्या कसोटीत केले. स्मिथच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाने पुन्हा एकदा टीम इंडियाला त्यांच्या घरच्या मैदानावर कसोटी सामन्यात पराभूत केले. या विजयासह स्मिथच्या नावावर मोठा विक्रम झाला आहे.

२०१० नंतर मायदेशात भारताला दोन कसोटीत पराभूत करणारा तो दुसरा कर्णधार ठरला. त्याच्या आधी हा विक्रम इंग्लंडचा माजी कर्णधार ॲलिस्टर कुकच्या नावावर होता.स्मिथच्या नेतृत्वाखाली दोन कसोटी जिंकल्या –

स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाने २०१० पासून मायदेशात दोन कसोटी सामन्यांमध्ये टीम इंडियाचा पराभव केला आहे. २०१७ मध्ये, पुणे येथे भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी सामन्यात स्टीव्ह स्मिथने कर्णधार म्हणून आपल्या संघाला विजय मिळवून दिला होता. यानंतर आता इंदूरमध्ये स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाला दुसऱ्यांदा कसोटी जिंकण्यात यश आले आहे. अशा स्थितीत पाहिले तर तो सध्याच्या काळात ऑस्ट्रेलियाचा सर्वात यशस्वी कर्णधार मानला जात आहे.

**भारताचा तीन वेळा पराभव**

२०१७ मध्ये ऑस्ट्रेलियाकडून पराभूत (कर्णधार स्टीव्ह स्मिथ)

२०२१ मध्ये इंग्लंडकडून पराभूत (कर्णधार जो रूट)

२०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाकडून पराभूत (कर्णधार स्टीव्ह स्मिथ)

### मालिकेत भारत 2-1 ने आघाडीवर

इंदोर कसोटीत भारतीय संघाला पराभवाला सामोरे जावे लागले असले, तरी टीम इंडिया अजूनही मालिकेत २-१ ने आघाडीवर आहे. अशा परिस्थितीत जागतिक कसोटी चॅम्पियनशिप अंतिम फेरी गाठण्यासाठी आणि मालिका जिंकण्यासाठी भारताला ९ मार्चपासून अहमदाबाद येथे सुरू होणारी चौथी कसोटी जिंकावी लागेल.

### 10 वर्षात भारताचा मायदेशात तिसरा पराभव

गेल्या १० वर्षात टीम इंडियाला घरच्या मैदानावर केवळ ३ कसोटी सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया हेच संघ भारताला मायदेशात पराभूत करणारे आहेत. यापूर्वी २०१२ मध्ये ॲलिस्टर कुकच्या नेतृत्वाखाली इंग्लंडने मुंबई आणि कोलकाता कसोटीत भारताचा पराभव केला होता.

---

## भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी मालिका

# टीम इंडियाचा लाजिरवाणा पराभव!

## ऑस्ट्रेलियाला विजयासाठी मिळालेले 76 धावांचे लक्ष्य त्यांनी एक गडी गमावून केले पूर्ण

।इंदूर ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**ऑस्ट्रेलियाने बॉर्डर-गावस्कर मालिकेच्या तिसऱ्या कसोटी सामन्यात शुक्रवारी तीन दिवसांच्या आत भारतावर नऊ गडी राखून दमदार विजय मिळवत चार सामन्यांच्या मालिकेत पुनरागमन केले आणि या विजयासह त्यांनी जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेच्या अंतिम सामन्यातील आपले स्थान निश्चित केले.**

### फिरकीला अनुकूल खेळपट्ट्यांना रोहितचा पाठिंबा

कर्णधार रोहित शर्मा भारतातील फिरकीला अनुकूल खेळपट्ट्यांना पाठिंबा देताना म्हणाला, की या खेळपट्ट्या आमची ताकद आहे आणि या खेळपट्ट्यांवर संघर्ष करत असलेल्या फलंदाजांना यामधून मार्ग काढावा लागेल. " मालिकेपूर्वी आम्ही कशा खेळपट्ट्यांवर खेळायचे आहे हे ठरवतो. अशा खेळपट्ट्यांवर खेळण्याचा निर्णय आमचा होता. आम्ही फलंदाजांवर दबाव निर्माण करत आहोत असे मला वाटत नाही. जेव्हा जिंकतो तेव्हा सर्वकाही चांगले वाटते. जेव्हा आम्ही पराभूत होतो, तेव्हा आमच्या फलंदाजीबाबत चर्चा केली जाते. या खेळपट्ट्यांवर आम्हाला आव्हान मिळेल याची कल्पना आहे आणि त्यासाठी आम्ही तयार आहोत. खेळपट्टीबाबत खूप अधिक चर्चा होत आहे आणि आम्ही भारतात खेळतो तेव्हा लक्ष केवळ खेळपट्टीवर असते," असे रोहित म्हणाला.



ऑस्ट्रेलियाला विजयासाठी मिळालेले ७६ धावांचे लक्ष्य त्यांनी एक गडी गमावून पूर्ण केले. या विजयानंतर आता ऑस्ट्रेलिया मालिकेत १-२ असा पिछाडीवर आहे. ट्रॅव्हिस हेड (नाबाद ४९) आणि मार्नस लबूशेन (नाबाद २८) यांनी डावाच्या सुरुवातीच्या षटकांमध्ये कठीण परिस्थितीचा सामना करताना ऑस्ट्रेलियाला १८.५ षटकांत विजय मिळवून दिला. गेल्या सहा वर्षांतील भारतात मिळवलेला हा ऑस्ट्रेलियाचा पहिला विजय आहे. भारताचा मायदेशात गेल्या १० वर्षांतील हा केवळ तिसरा पराभव आहे. भारताला ९ मार्चपासून अहमदाबाद येथे सुरू होणाऱ्या अखेरच्या कसोटी सामन्यापूर्वी आपल्या योजनांवर पुन्हा नव्याने मेहनत घेण्याची आवश्यकता आहे. मालिकेत तयार करण्यात आलेल्या खेळपट्ट्यांवर टीका झाली आहे. त्यामुळे भारत फिरकीला अनुकूल असणाऱ्या खेळपट्टीला प्राथमिकता देणार की नाही हे पाहणे उत्सुकतेचे असेल. भारतीय फलंदाजही या खेळपट्ट्यांवर संघर्ष करताना दिसले. भारताला आपल्या दोन्ही डावांत १०९ आणि १६३ धावाच करता केल्या.

ऑस्ट्रेलिया संघ नागपूर आणि दिल्ली येथील दुसऱ्या डावात अडखळला, त्यावरून शुक्रवारी पहिल्या सत्रात काहीही होऊ शकते, असे दिसत होते. ७६ धावांच्या माफक आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन संघाला रविचंद्रन अश्विनने दुसऱ्याच चेंडूवर सलामीवीर उस्मान ख्वाजाला बाद करत झटका दिला. ख्वाजा बाद झाल्यानंतर ऑस्ट्रेलियन संघ दबावात होता. मग लबूशेनने रवींद्र जडेजाच्या चेंडूवर चौकार मारत दबाव कमी केला. हेड आणि लबूशेन आक्रमक फलंदाजीसाठी ओळखले जातात. मात्र, दोघांनीही अधिक जोखीम न घेता सुरुवातीच्या १० षटकांत केवळ १३ धावा केल्या. डावाच्या दहाव्या षटकात चेंडू बदलल्यानंतर सामन्याचे चित्र पालटले. अश्विन या नवीन चेंडूने समाधानी नव्हता आणि हेडने त्याच्या षटकात चौकार व षटकार मारत आपले मनसुबे स्पष्ट केले. हेड व लबूशेन यांनी नंतर जडेजाविरुद्ध चौकार लगावले आणि सामन्यावर ऑस्ट्रेलियाने मजबूत पकड निर्माण केली. लबूशेनने चौकार लगावत ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला.